# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १२३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०९ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## काँग्रेसचा 'डीएमके'शी काडीमोड हा राजकीय मूर्खपणा; काँग्रेसच्या नेत्याची टीका

तिरुअनंतरपुरम दि.८ (वृत्तसंस्था)- तमिळनाडूमधील राजकीय घडामोडींचे परिणाम राष्ट्रीय पातळीवर उमटू लागले आहेत. ४ मे रोजी निकाल लागलेल्या विधानसभा निवडणुकीत जोसेफ विजयच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या असल्या तरी बहुमताच्या संख्येपासून ते दूर राहिले. यामुळे बहुमत गाठण्यासाठी काँग्रेसने विजयला पाठिंबा दिला. मात्र यामुळे इंडिया आघाडीत फूट पडली आहे. काँग्रेसने निवडणुकीआधी द्रमुकशी आघाडी करत निवडणूक लढवली होती. मात्र आता विजयला पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसने द्रमुकशी असलेली ५० वर्षांपूर्वीची आघाडी मोडली आहे. द्रमुक पक्षासह आता काँग्रेसचे नेतेही यावर टीका करत आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणीशंकर अय्यर यांनी द्रमुकशी असलेली आघाडी मोडल्यानंतर स्वतःच्या पक्षावर टीका केली आहे. विजयच्या पक्षाशी युती केल्यामुळे काँग्रेसने महात्मा गांधींचे नैतिकतेचे सरकार स्थापन करण्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले आहे. मणीशंकर अय्यर म्हणाले, '१०० वर्षांपूर्वी नोव्हेंबर १९२५ मध्ये महात्मा गांधी यांनी 'नवजीवन' या गुजराती मासिकातून असा संदेश दिला होता की, स्वराज्य म्हणजे नैतिकतेवर आधारित सरकार असायला हवे. काँग्रेसने मागच्या निवडणुकीत टीव्हीके पक्षाचा विरोध केला होता. त्यानंतर आता स्वतःहूनच काँग्रेस पक्ष सत्तेच्या जहाजात जाऊन बसला आहे. हा महात्मा गांधींच्या काँग्रेस पक्षाने त्यांनीच दिलेल्या विचाराला फाटा दिला आहे. अशाप्रकारचे राजकारण फार काळ टिकत नाही.'

# नाशिकमधील टीसीएस धर्मांतर प्रकरणात अटक केलेल्या निदा खानला ११ मेपर्यंत पोलीस कोठडी

## निदा खानला एमआयएमने लपवून ठेवले होते, इम्तियाज जलील यांची चौकशी करा, संजय शिरसाटांचा गंभीर आरोप

नाशिक/छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे शोषण, सक्तीने धर्मांतर करण्याचे प्रयत्न, धार्मिक भावना दुखावणे, विनयभंग आणि मानसिक छळ यांसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या नऊ गुन्ह्यांची एसआयटीमार्फत चौकशी सुरू आहे. याच प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले असून, फरार असलेली महिला आरोपी निदा खान हिला अखेर अटक करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथून नाशिक गुन्हे शाखा आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांच्या संयुक्त पथकाने तिला छत्रपती संभाजीनगरमधील नरेगाव परिसरातील कैसर कॉलनीतील एका फ्लॅटमधून ताब्यात घेतले आहे. निदा खानला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

निदा खान गरोदर असल्याने तिच्या आईला दोन वेळेत भेटण्याची परवानगी न्यायलयाने दिली आहे. पोलिस कोठडी दरम्यान दररोज सकाळी ११ ते ११:१५ वाजता आणि सायंकाळी ५ ते ५:१० ह्या दररोज दोन वेळेत आईला भेटण्याची न्यायालयाने परवानगी दिली आहे. गेल्या ४० दिवसांपासून फरार असलेल्या निदा खानला छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली. मध्यरात्री अटकेची कारवाई केल्यानंतर पोलिसांनी आज (८ मे) नाशिकरोड न्यायालयात हजर केले. न्यायालयाने निदा खानला ११ मे पर्यंत चार दिवस पोलिस कोठडी सुनावली. अटक करण्यात आलेल्या निदा खानच्या आई-वडील आणि मावशीची पोलिस चौकशी करणार आहेत.

दरम्यान, निदाच्या ४० दिवसांच्या पळापळीचा अखेर अंत झाला आहे. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी राबवलेल्या एका अत्यंत गुप्त आणि वेगवान मोहिमेत निदा खानला छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. नाशिक पोलिसांच्या एसआयटी तपासात तांत्रिक माहितीच्या आधारे निदा खान संभाजीनगरमध्ये असल्याची खात्री पटली. यानंतर नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी संयुक्त कारवाईचे नियोजन केले. पोलिसांनी सलग दोन दिवस त्या संशयास्पद इमारतीवर लांबून नजर ठेवली. आरोपीला संशय येऊ नये म्हणून पोलिसांनी गणवेश टाळून साध्या वेशातील पथके तैनात केली होती. कारवाईसाठी सरकारी गाड्यांचा वापर न करता, खासगी आणि विनाचिन्हांकित वाहनांचा वापर करण्यात आला. निदा खान घरात असल्याची खात्री पटताच रात्री पोलिसांनी नियोजनबद्धरीत्या छापा टाकला आणि निदा खानला ताब्यात घेतले.

छत्रपती संभाजीनगरमधील नारेगावमधील एमआयएमचे नगरसेवक मतिन पटेल यांनी निदा खानला आश्रय दिल्याचे समोर आले असून नाशिक पोलिसांनी त्यांस सहआरोपी केले आहे. दरम्यान निदा खानच्या अटकेनंतर सामाजिक (पान ४ वर)

### एमआयएमचा हात होता का? शोध घेतला जाईल-मुख्यमंत्री

नाशिक येथील धर्मांतर प्रकरणात नाव असलेल्या निदा खानला अटक केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव भागात निदा खानला लपवून ठेवण्यात एमआयएमच्या नगरसेवकाचा हात होत का? याबरोबरच आणखी कोणाचा हात आहे? या रॅकेटला कोन मदत करत होते. याचा पुरेपूर शोध घेतला जाईल असे मुख्यमंत्र्यांनी वृत्तवाहीनीशी बोलतांना स्पष्ट केले.

### तमिळनाडूत 'टीव्हीके'चा सत्तास्थापनेचा मार्ग अखेर मोकळा!

# विजय थलपती आज घेणार मुख्यमंत्री पदाची शपथ !



तिरुअनंतरपुरम दि.८ (वृत्तसंस्था)- तमिळनाडू विधानसभा निवडणुनकीत जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र या पक्षाला निवडणुकीत बहुमताचा आकडा गाठता आलेला नव्हता. दरम्यान आता तमिळनाडूमध्ये सीपीआय, सीपीआय (एम) आणि व्हीसीके हे पक्ष विजयच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याची बाब समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या तिन्ही पक्षांशी चर्चा करून त्यांना टीव्हीकेला बहुमताचा आकडा गाठण्यास मदत करण्यासाठी तयार केले आहे.

विजयच्या पक्षाने निवडणुकीत १०८ जगा जिंकल्या आहेत, तर काँग्रेसने पाच जागांवर विजय नोंदवला आहे. इतर तीन पक्षांचे प्रत्येकी २ आमदार आहेत. त्यामुळे ११८ असा बहुमताचा आकडा विजय यांच्याकडे झाला असून ते उद्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असल्याचे वृत्त देण्यात आले आहे.

काँग्रेसकडून घेण्यात आलेल्या पुढाकारानंतर लहान पक्षांनी विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीआय आणि सीपीआय-एम हे दोन्ही पक्ष राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याच्या विरोधात आहेत. दुसरीकडे व्हीसीकेने तामिळनाडूच्या राजकारणात कोणताही बाह्य हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही अशी भूमिका स्पष्ट केली आहे.


'आम्ही लोकांनी दिलेला जनादेश बाजूला ठेवून पुन्हा निवडणुकीला सामोरे जाऊ शकत नाहीत,' असे एका सीपीआय (एम) नेत्याने इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले. याबरोबरच सध्याच्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेत एआयडीएमके आणि डीएमके यांच्यात युती होऊ शकते, याची भीती देखील या तीन पक्षांना आहे.

'लोकांनी आधीच डीएमके आणि एआयडीएमके यांना नाकारले आहे. लोकांनी निवडून न दिलेलं सरकार का अस्तित्वात यावं?' असे एक सीपीआय नेते म्हणाले.

## बिहारमध्ये नोकऱ्यांसाठी बेरोजगार तरुणांचे आंदोलन, पोलिसांचा लाठीमार

पाटण दि.८ (वृत्तसंस्था)- बिहारमध्ये नोकरी मागणाऱ्या तरुण तरुणींना पोलिसांनी बेदम मारहाण केली. अनेकांवर लाठीचार्ज केल्याने डोकी फुटली आहेत. रस्त्यावर पाठलाग करून त्यांना मारहाण करण्यात आली. एका महिला उमेदवाराला पोलीस अधिकाऱ्यांनी पायाखाली तुडवलं. उमेदवार म्हणाले, 'आम्ही भविष्यातील शिक्षक आहोत. हे लोक आम्हाला गुंडांप्रमाणे मारत आहेत.' लाठीचार्जनंतर उमेदवारांच्या चपला रस्त्यावर विखुरल्या होत्या. एका उमेदवाराचे कपडे छातीपर्यंत रक्ताने भिजले होते. लाठीचार्जनंतर उमेदवारांनी आपले अर्धे कपडे काढून रस्त्यावर बसून घोषणाबाजी केली. सरकारने आजच टीआरई-४ च्या रिक्त जागा जाहीर कराव्यात, अशी त्यांची मागणी आहे. रिक्त जागा जाहीर करण्याच्या मागणीसाठी उमेदवार आज सकाळी १० वाजता पाटणा कॉलेजमधून निघाले. ते बीपीएससी कार्यालयाच्या दिशेने मोर्चा काढत होते. पोलिसांनी जेपी गोलंबर येथे सर्वांना अडवले, ज्यामुळे लाठीचार्ज झाला. या आंदोलनात अंदाजे ५,००० उमेदवार सहभागी झाले होते. लाठीचार्जच्या आधी, पोलिसांनी जेपी गोलंबर येथे बॅरिकेड्स लावून उमेदवारांना थांबवले होते. उमेदवारांनी बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान, तीन बसेसमधून लाठीचार्ज करण्यात आला. पाण्याचे फवारे आणि अश्रुधूर गोळ्यांचेही आदेश देण्यात आले होते, पण त्यांचा वापर न करताच पोलिसांनी लाठीचार्ज केला.

# सुवेंदू अधिकारी असणार पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री



कोलकाता दि.८ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी हेच आता नवे मुख्यमंत्री होणार आहेत. पश्चिम बंगाल भाजपाने याची घोषणा शुक्रवारी केली. पश्चिम बंगालच्या सत्ता स्थापनेचा विषय मार्गी लावण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज कोलकाता येथे आले होते. त्यांच्या उपस्थितीत सुवेंदू अधिकारी यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.

कोलकाता येथील बिस्वा बांगला कन्व्हेन्शन सेंटरमध्ये भाजपाच्या पश्चिम बंगाल कार्यकारिणी आणि नवनिर्वाचित आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि प्रदेशाध्यक्ष शमिक भट्टाचार्य उपस्थित होते. या बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत बोलत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, निवडणुका संपल्या असून पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. आता सर्वांनी एकच नाव पुढे केले आहे. दुसरे नाव निवडण्यासाठी नेत्यांना वेळ देण्यात आली, मात्र दुसऱ्या कुणाचेही नाव पुढे आले नाही. यामुळे आता सुवेंदू अधिकारी हेच पश्चिम बंगाल चे मुख्यमंत्री असतील यावर शिक्कामोर्तब झाले आहे. ५५ वर्षीय सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ साली नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. त्यानंतर पाच वर्ष त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा तब्बल १५ हजार मतांनी दणदणीत पराभव केला.

## देशभर दंगली घडवण्याचे भाजपचे षडयंत्र; हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्ष २०२९ च्या निवडणुका जिंकण्यासाठी देशभर धार्मिक तेढ निर्माण करत असून, २००२ च्या गुजरात दंगलींप्रमाणेच हिंसाचार घडवण्याचे षडयंत्र आखले जात आहे, असा खळबळजनक आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी केला. पाच राज्यातील निवडणुकीनंतर काही राज्यांत सुरू झालेला हिंसाचार हा याच मोठ्या कारस्थानाचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी केंद्र सरकार आणि भाजपावर अनेक गंभीर प्रश्नांची सरबत्ती केली. सपकाळ यांनी जनगणना आणि त्यानंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेवर भाष्य करताना सांगितले की, 'जानेवारी २०२८ मध्ये सुरू होणाऱ्या डिलिमिटेशन प्रक्रियेसाठी कोणत्या निवृत्त न्यायाधीशाला समितीत घ्यायचे, हे भाजपने आधीच ठरवले आहे. इतकेच नाही, तर पुनर्रचनेनंतरचा मतदारसंघांचा नकाशाही आत्ताच तयार आहे. ही सर्व प्रक्रिया लोकशाहीला पायदळी तुडवणारी आहे.

तामिळनाडूतील राजकीय समीकरणांवर बोलताना त्यांनी जोसेफ विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाला दिलेल्या पाठिंब्याचे समर्थन केले. 'स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांची निवडणुकीपूर्वीच आघाडीची इच्छा होती. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी लढा देणाऱ्या पक्षांसोबत उभे राहण्यास काँग्रेस कटिबद्ध आहे,' असे ते म्हणाले.

# दहावीच्या परीक्षेत मराठी मातृभाषा असलेले तब्बल ९४ हजार ५४४ विद्यार्थी मराठी विषयातच नापास!

## निकालात कोकण विभाग अव्वल तर छत्रपती संभाजीनगर पिछाडीवर

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल मंडळामार्फत जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत मराठी मातृभाषा असलेले तब्बल ९४ हजार ५४४ विद्यार्थी मराठी विषयाच्याच पेपरमध्ये नापास झाले आहेत. ही आकडेवारी धक्कादायक असून मराठी भाषेच्या अध्यापन प्रक्रियेवरच त्यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे.

या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५ लाख ५५ हजार ०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ लाख ४२ हजार ४७२ विद्यार्थ्यांनी (पान ४ वर)

### कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक

सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९७.६२ टक्के) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) सर्वात पिछाडीवर आहे. इतर विभागांमध्ये कोल्हापूर विभागाचा निकाल ९५.४७ टक्के, मुंबई- ९४.९७, पुणे- ९४.२४, नाशिक- ९०.५३, अमरावती- ९०.५०, नागपूर- ८९.०७ तर लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के लागला आहे.

## सोहराबुद्दीन बनावट चकमक प्रकरण; अमित शहा यांच्या दोषमुक्तीला दिलेले आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळले

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- कुख्यात गुंड सोहराबुद्दीन शेख, त्यांची पत्नी कौसर बी आणि त्यांचा साथीदार तुलसीराम प्रजापती यांच्या कथित बनावट चकमक प्रकरणी २२ जणांच्या निर्दोष सुटकेचा निर्णय कायम ठेवताना, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना या प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या निर्णयाला विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली. ही याचिका कदाचित शहा यांच्या काही 'राजकीय विरोधकांच्या' सांगण्यावरून दाखल करण्यात आली असावी, असे निरीक्षणही न्यायालयाने ती फेटाळताना प्रामुख्याने नोंदवले.

शहा यांना प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या निर्णयाला मणियार कल्पेश कुमार नावाच्या व्यक्तीने उच्च न्यायालयात अंतरिम याचिकेद्वारे आव्हान दिले होते. मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने त्याची ही मागणी फेटाळली. ही याचिका एखाद्या कुटील उद्देशाने आणि शहा यांच्या एखाद्या राजकीय विरोधकाच्या सांगण्यावरून दाखल करण्यात आली आल्याचे नमूद करण्यास आम्हाला कोणताही संकोच वाटत नाही, असे मुख्य न्यायमूर्तींनी आदेशात विशेषकरून नमूद केले. प्रकरणातील २२ आरोपींची निर्दोष सुटका करण्याविरोधात सोहराबुद्दीन याच्या दोन भावांनी दाखल केलेले अपील प्रलंबित होते. त्यावेळी, मणियार याने ही अंतरिम याचिका दाखल केली होती. त्याद्वारे त्याने शहा यांना प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या विशेष सीबीआय न्यायालयाने ३० डिसेंबर २०१४ रोजी दिलेल्या निर्णयाला आव्हान दिले होते.

## डोनाल्ड ट्रम्प यांना आणखी एक धक्का, ट्रम्प यांनी लावलेले १० टक्के टॅरिफ रद्द, फेडरल कोर्टाचा मोठा निर्णय

न्यूयॉर्क दि.८ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकीकडे डीलसाठी इराणवर दबाव टाकत आहेत. मात्र, दुसरीकडे डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का बसला आहे. अमेरिकेच्या फेडरल कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांनी ललावलेलं १० टक्के टॅरिफ रद्द केलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेलं टॅरिफ योग्य नसल्याचं कोर्टानं म्हटलं आहे.

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेले १० टक्के टॅरिफ १९७४ च्या व्यापार अधिनियमाच्या कलम १२२ नुसार कायदेशीर दृष्ट्या योग्य नाही. या कारणामुळं ते रद्द करण्यात असल्याचं कोर्टानं म्हटलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ फेब्रुवारी २०२६ ला जगभरातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर १० टक्के टॅरिफ लावलं होतं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेचं अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर विविध देशांवर टॅरिफ लादलं होतं. ते टॅरिफ सुप्रीम कोर्टानं रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. अमेरिकन सुप्रीम कोर्टानं टॅरिफ रद्द केल्यानंतर ट्रम्प यांनी १० टक्के टॅरिफ लादलं होतं. ट्रम्प यांनी १० टक्के टॅरिफ लादल्यानंतर २४ राज्ये आणि काही छोट्या व्यापारांनी ट्रम्प यांच्या निर्णयाला आव्हान दिलं होतं. आता फेडरल कोर्टानं ट्रम्प यांचं १० टक्के टॅरिफ रद्द केलं आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापार कोर्टानं २-१ च्या बहुमतानं निर्णय घेतला. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १९७४ च्या व्यापार कायद्याच्या कलम १२२ चा चुकीचा वापर केला, असं कोर्टानं म्हटलं. तर, एका न्यायमूर्तींनी सध्या छोट्या व्यापाऱ्यांच्या विरोधात निर्णय देणं गडबडीचं ठरेल, असं म्हटलं. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाला टाळण्याचा आणि बाजूला ठेवण्याचा प्रयत्न १० टक्के टॅरिफमधून करण्यात आल्याचं छोट्या व्यापाऱ्यांनी म्हटलं होतं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय आपात्कालीन आर्थिक शक्ती कायद्याच्या नुसार लावलेले २०२५ मधील टॅरिफ रद्द करण्यात आलं होतं.

## सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था उरली नाही का?- सुप्रिया सुळे

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रामध्ये शेतकरी प्रचंड अडचणीत आहेत, अवकाळी पाऊस होत आहे. सरसकट कर्जमाफी करू असा शब्द महाराष्ट्र सरकारने दिलेला आहे, पण कर्जमाफी झालेली नाही. राज्याच्या कोणत्याही भागात गेलात तरी शेतकऱ्यांचे मोठे हाल होताना दिसून येत आहे. शेतकऱ्यांबद्दल सरकारला काही आस्था नाही का असा प्रश्न पडतो, कारण घोषणा मोठ्या झाल्या तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना काहीच भेटत नाही, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पुण्याची कायदा आणि सुव्यवस्था गेली काही वर्षे अडचणीत आहे हे मी सातत्याने सांगत आहे. याकडे सरकारने लक्ष द्यावे अशी मागणी मी गेली ३ ते ४ वर्षे करत आहे. कांदा असो की दुध असो शेतकऱ्यांना कुठेच न्याय मिळताना दिसून येत नाही. शेतकऱ्यांच्या पीकाला भाव नाही. युरियाचा तुटवडा जाणवतो आहे. डिझेल भेटत नाही, अशी परिस्थिती झाली आहे. शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. (पान ४ वर)

## मनोज जरांगे सरकारविरोधात पुन्हा मैदानात; १६ तारखेला आंतरवाली सराटीतील बैठकीत आंदोलनाची करणार घोषणा; मुख्यमंत्र्यांवर टीका

जालना दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी मराठा समाजाच्या न्याय मागण्यांसाठी पुन्हा एकदा एक मोठे आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाची तारीख ते १६ मे रोजी आंतरवाली सराटीत आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत घोषित करणार आहे. या सरकारला कितीही मायेने बोलले, तरी ते आपले अश्रू पुसणार नाही. त्यामुळे त्याला दयामाया न दाखवता आंदोलन केले, तरच न्याय पदरात पडेल, असे ते आपल्या आगामी आंदोलनाची माहिती देताना म्हणालेत.

मनोज जरांगे आज पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मी मराठा समाजाला पूर्वीपासूनच एकजुटीने राहण्याचे आवाहन करत आहे. तुम्ही या सरकारला असे कितीही पोटतिडकीने सांगितले, कितीही मायेने सांगितले तरी, ते कधीही आपल्या डोळ्यांचे अश्रू पुसणार नाही. तुम्हाला आंदोलनाच्या पवित्र्यात यावे लागेल, पण कट्टरतेने यावे लागणार आहे. तुम्हाला सरकारची किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षाची दयामाया दाखवता येणार नाही. असे झाले तरच न्याय पदरात पडू शकतो, अन्यथा नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना व्याजाचा परतावा मिळत नाही. त्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुण उद्योजक आर्थिक अडचणीत सापडलेत. जरांगे यांनी यावरही भाष्य केले. ते म्हणाले, आपण १६ मे रोजी पुढील आंदोलनाची घोषणा करणार आहोत. याविषयी आंतरवाली सराटीत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. आपण या राज्यात खूप मोठे आंदोलन उभे करणार आहोत. त्याची तारीख १६ तारखेला घोषित केली जाईल. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील व व्यवस्थापकीय संचालक यांच्यातील वादाची आतली गोष्ट मला माहिती नाही.

मनोज जरांगे म्हणाले, मराठा समाजाच्या तरुणांचे सिबिल खराब होत आहे. ते कर्जबाजारी होत आहेत. त्याचे मूळ (पान ४ वर)

## निराधार गतिमंद महिलेवर अज्ञात नराधमाचा अत्याचार; पोलिसांचा शोध सुरु

चंद्रपूर दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात महिला अत्याचाराच्या घटनामध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यातच माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातून समोर आली आहे. एका गतिमंद महिलेच्या परिस्थितीचा फायदा घेत एका नराधमाने तिच्यावर अत्याचार केला. या अमानवीय कृत्यामुळे पीडित महिला पाच महिन्यांची गर्भवती राहिली असून, या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला गतिमंद असून तिला बोलता येत नाही. आई-वडिलांच्या निधनानंतर ती गावात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत एकटीच राहत होती. तिला कोणीही वाली नसल्याचे पाहून अज्ञात आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

काही दिवसांपूर्वी गावातील आशा सेविका आणि स्थानिक महिलांना पीडितेच्या शारीरिक हालचालींवरून संशय आला. त्यांनी तातडीने तिला विश्वासात (पान ४ वर)

## समाजसेवक भाऊराव पाटील

महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक. सर्व जातिधर्माच्या गरीब ग्रामीण रयतेला आपल्या भगीरथ प्रयत्नांनी त्यांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून दिली; म्हणून अनेक विद्वान व बहुजन समाज आदराने आणि प्रेमाने त्यांना कर्मवीर म्हणू लागला. कुंभोज (जि. कोल्हापूर) या खेड्यात पायगोंडा व गंगुबाई या जैन दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. एतवडे बुद्रुक (जि. सांगली) येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे ते कोल्हापुरात इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. शाहू महाराजांच्या प्रभावाखाली त्यांच्यावर समाजसेवेचे संस्कार झाले. विद्यार्थिदशेतज सातव्या एडवर्ड बादशाहाच्या पुतळ्यास डांबर फासल्याच्या खोट्या आरोपावरून त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. त्याला कंटाळून आत्महत्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु पुढे त्यांची सुटका होऊन त्यांनी कोल्हापूर सोडले.

ओगले काच कारखान्याचे व पुढे किर्लोस्कर नांगराचे १९१४ ते १९२२ या दरम्यान ते विक्रेते होते. या काळात ठिकठिकाणी खेड्यांत हिंडल्या मुळे जनतेचे दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव यांची जाणीव त्यांना झाली. त्यातून दुधगाव (जि. सांगली) येथे विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आश्रम काढला. कराडजवळील काले या गावी त्यांनी पहिले वसतिगृह काढले (१९१९). तोच रयत शिक्षण संस्थेचा शुभारंभ होता. पुढे १९२४ मध्ये सातारा येथे अस्पृश्यांसह सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृह काढले. त्यास राजर्षी शाहू महाराजांचे नाव देण्यात आले. महात्मा गांधींनी या वसतिगृहास १९२७ साली भेट दिली. तेव्हापासून भाऊराव खादी वापरू लागले व राजकारणापासून दूर राहून शिक्षणाच्या कार्यास त्यांनी पूर्णतः वाहून घेतले. गोरगरीब पण हुशार मुले जेथे जेथे खेड्यापाड्यांत दिसतील, तेथून त्यांना उचलून आणून वसतिगृहात ठेवून पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळले. त्यांतील काही विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाची सोय पालक या नात्याने त्यांनीच केली. 'स्वावलंबानाने कष्ट करून शिका', हा त्यांचा मंत्र होता.

वास्तविक भाऊराव बहुजनसमाजाच्या शैक्षणिक उद्धाराकडे वळले, त्याचे कारण सत्यशोधक चळवळीशी त्यांचा अत्यंत संस्कारक्षम अशा वयात आलेला निकटचा संबंध. या चळवळीतून बहुजनसमाजाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळावयाची, तर तिचा रोख शिक्षण प्रसाराच्या द्वारा त्या समाजातील अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याकडे असणे आवश्यक होते. भाऊरावांनी शिक्षणकार्य पतकरून हे साधण्याचा नेटका प्रयत्न केल ा. या कार्यामुळे विरोधक व सनातनी मंडळींचा रोष होऊन त्यांना जाच सहन करावा लागला. स्वतःच्या मातापित्यांची व समाजाचीही इतराजी त्यांनी ओढवून घेतली. सर्व जातीधर्मांचे आजन्म कार्यकर्ते सेवक या संस्थेत तयार झाले. रयत शिक्षण संस्था खऱ्या अर्थाने जनतेची झाली. वटवृक्ष हे बोधचिन्ह व स्वावलंबी शिक्षण हे संस्थेचे बोधवाक्य ठरले. भाऊरावांची पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या कार्यात मनःपूर्वक साथ दिली. त्यांना तीन मुले झाली; दोन मुली आणि एक मुलगा. संस्थेचे विद्यमान संघटक अप्पासाहेब हे त्यांचे चिरंजीव होत.

गांधींवधानंतरच्या उद्रेकात १९४७ साली संस्थेचे सरकारी अनुदान काही दिवस स्थगित करण्यात आले; पण कर्मवीर भाऊराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाणेदारपणाने लोकाश्रयावर संस्था पुढे चालविली व संवर्धित केली. कर्मवीर भाऊराव हे विलक्षण जिद्दीचे व धडाडीचे कार्यकर्ते होते. धिप्पाड शरीर, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि गरीब, पददलितांचा अंतर्यामी जिव्हाळा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत. महात्मा फुले व राजर्षी शाहू यांची शिक्षणाप्रसाराची इच्छा त्यांनी पूर्ण केली. पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट्.' ही सन्मान्य पदवी अर्पण केली. सद्‌गुरू गडगे बाबांचेही रयत शिक्षण संस्थेस अमोल साहाय्य झाले. हृदयविकाराने भाऊरावांचे पुण्यास निधन झाले. भगीरथ प्रयत्नांनी भाऊरावांनी खेड्यापाड्यांत ज्ञानगंगा नेऊन पोहोचविली. या संस्थेची ३१२ माध्यमिक विद्यालये व १९ महाविद्यालये आहेत. शिक्षणमहर्षी भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली!

# क्रांतिवीर महाराणा प्रतापसिंह यांचे प्रेरणादायी चरित्र

**भारताला** चारित्र्य संपन्नतेची महान परंपरा लाभलेली आहे. देशात अनेक थोर, शूर व कर्तृत्व सम्पन्न राजे, महाराजे, वीर होऊन त्यांनी भारत मातेच्या रक्षणार्थ शेवटच्या श्वासापर्यंत लढा तर दिला व आपला स्वाभिमान, आपली राष्ट्रनिष्ठा व चारित्र्य निष्कलंक व पवित्र राखण्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले. शत्रू कडून त्यांना अनेक प्रलोभने दाखविण्यात आली परंतु त्यांनी भारत भूमीची इमाने -इतबारे रक्षा करून आपले चारित्र्य राखले. 'मोडेन पण वाकणार नाही' हा बाणा बाळगणारे महाराणा प्रतापसिंह यापैकी एक चारित्र्य संपन्न राणा होते.महाराणा प्रतापसिंह यांनी चित्तोड च्या आसनावर विराजमान होताच एक प्रतिज्ञा केली होती,' जो पर्यंत चित्तोड आणि मेवाडचाउर्वरित भाग मोगलांच्या गुलामगिरीतून मुक्त करून घेत नाही, तोपर्यंत जमिनीवर झोपेल, पत्रावळीवर जेवण करेल व डोक्यावरील पगडीत काळा धागा बांधेले'. आजही सिसोदिया परिवारात डोक्यावरील पगडीत काळा धागा बांधण्यासाची प्रथा चालू आहे. महाराणा प्रतापसिंह यांच्या कार्यकर्तृव व जीवनसंघर्ष कडे पाहिले तर त्यांच्या चारित्र्यचे अनेक पैलू दिसून येतात. महाराणा प्रतापसिंह यांचे चारित्र्य उच्च व स्वाभिमानाचे महाराणा प्रतापसिंह यांचे चारित्र्य म्हणजे पवित्रता,शुद्धता व निर्मलतेने परिपूर्ण होय.देशाची व मातृभूमीची स्वाधिनता सर्वोच्च असे ते मानत.आणि ही स्वाधिनता व सर्वोच्चता अबाधित राखणे हे राणाजीनी आपले आद्य कर्तव्य मानले.व्यक्तीपेक्षा देश व मातृभूमी श्रेष्ठ आहेत आणि देशाची स्वाधिनता टिकविणे ही खरी कसोटी ते मानत. हलदी घाटीच्या युद्धात ऐंशी हजार मोगल सैनिकांसमोर राणाजी आपल्या वीस हजार सैनिकांसमवेत लढले व मोगलांना सळो की पळो करून सोडले.



राजपुतांचे हे युद्धकौशल्य पाहून व राष्ट्रभक्ती पाहून अकबराने महाराणा प्रतापसिंह विरुद्ध युद्ध करणे सोडून दिले. आदिवासींच्या हृदयात देशभक्ती व मातृभूमी निष्ठा जागृत केली. महाराणा प्रतापसिंह यांच्या कडे म नुष्यबळ कमी होते, म्हणून त्यांनी जंगलात राहर्णाया आदिवासीच्या मनात देशभक्ती व मातृभूमी निष्ठा जागवून त्यांची मदत घेतली. या आदिवासीच्या मनात त्यांनी स्वाभिमानाने जगण्याची क्षमता निर्माण केली.आजही मेवाड येथे काही ऐतिहासिक चित्रशैलीत एकीकडे राजपूत तर दुर्सया बाजूला आदिवाशींचे चित्र दिसते.यातून महाराणा प्रतापसिंह यांची राष्ट्रीय एकात्मता व बंधुता दिसून येते.

मेवाडच्या अस्तित्व व स्वाभिमानासाठी लढा राजपूत आणि आदिवासी यांची मेवाडची रक्षा करणे प्राणापलिकडे होते. राजपूत व आदिवासी यांची एकी मेवाडच्या स्वाभिमान व अस्तित्वासाठीची लढाई होती जी इतिहासात सुवर्णा अक्षरांनी लिहिल्या गेलेलीआहे. महाराणा प्रतापसिंह यांचे मनोबल उच्च विचार सरणीचे राहीले- महाराणा प्रतापसिंह यांचे मनोबल सदैव उच्च राहीले.जेंव्हा अमरसिंहने मुघल सरदार खान-खाना यांच्यावर हमला केला व त्याच्या जनान खाण्यातील महिलांना कैद केले तेंव्हा महाराणा प्रतापसिंह सक्त नाराज झाले ,त्यांनी अमरसिंहला आदेश दिला की,शत्रू पक्षच्या महिलांना तात्काळ मुक्त करावे,व त्यांना मान, सन्मानाने खान खाना कडे पाठवावे,हे जेंव्हा खानाला समजले त्याने राणा प्रताप विरुद्ध तलवार उचलणे सोडून दिले.राणा प्रताप यांनी परस्त्रीला मातेसमान मानले, स्त्री दाक्षिण्याची त्यांची ही नीती वाखणण्यासारखी आहे.त्यांच्या सैनिकात सैनिक म्हणून हकीम खान सुरी प्रमुख होता. राणा प्रतापसिंह यांनी भेदा भेद कधीच केला नाही, हा आदर्श त्यांच्यापासून घेण्यासारखा आहे.

महाराणा प्रतापसिंह यांनी राष्ट्रीय मूल्ये प्राणापलिकडे जपली

महाराणा प्रतापसिंहांची भारत भूमीवर प्रखर निष्ठा होती.ज्या मातीत जन्म घेतला तिचे रक्षण करणे,तिची स्वाधिनता अबाधित ठेवणे आद्य कर्तव्य त्यांनी मानले. राष्ट्रनिष्ठा, राष्ट्राभिमान, राष्ट्रीयता ही मूल्ये त्यांच्या रोमा, रोमात सामावलेली होती. राष्ट्रहितापुढे सर्व बाबी तुच्छ मानल्या, राष्ट्रापेक्षा कोणीही मोठा नाही, असे मानणारे म हाराणा प्रतापसिंह म्हणजे राष्ट्रीय एकता, अखंडता व बंधुताचे व समताचे महान प्रतीक होत.

**महाराणा प्रतापसिंह यांनी संपूर्ण विश्वाला स्वाभिमानाचा पाठ दिला**

विश्वातील संपूर्ण मानव जातीला ताठ मानेने जगून स्वाभिमानाने जीवन जगण्याचा पाठ म हाराणा प्रताप सिंह यांनीच दिला. 'सर कट सकता है--मगर झुक नही सकता' हा बाणा महाराणा प्रतापसिंह यांनी संपूर्ण मानव जातीला दिलेला आहे.

**देश व मातृभूमीसाठी सर्वस्व त्यागणारा महाराणा** - महाराणा प्रतापसिंह यांच्या ठायी राष्ट्रभक्ती, व राष्ट्रनिष्ठा परिपूर्ण होती.देश व मातृभूमी प्रथम आणि नंतर दुसरे असे मानणारे महाराणा प्रतापसिंह अत्यंत स्वाभिमानी जगले.देशासाठी व मातृभूमी साठी जगणारे महाराणा प्रतापसिंह एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होय.देशावर येर्णाया प्रत्येक संकटाचा सामना करण्यासाठी घर,संसार,सुख, वैभवाचा त्याग करण्याची वेळ आली तरी चालेल परंतु राष्ट्राप्रति कर्तव्य पार पाडायलाच हवे असे त्यांचे मानणे होते. अशा या महान व थोर क्रांतिकारकांच्या स्मृतींना कोटी!कोटी!!प्रणाम..


**- धोंडीरामसिंह राजपूत**
वैजापूर. जि.संभाजीनगर

# कर्मवीर भाऊराव पाटील आणि शैक्षणिक विचार

महाराष्ट्राची भूमी संत महंतांची तशी ती थोर समाजसुधारकांची सुद्धा आहे. तद्वतच या भूमीने थोर शिक्षण प्रेमी व थोर शिक्षण तज्ज्ञांनाही जन्म दिलेला आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या अपेक्षित वर्तन बदलाचे प्रमुख साधन मानल्या गेलेले आहे. शिक्षणाशिवाय व्यक्तीचे जीवनात परिवर्तन नाही. शिक्षणाशिवाय व्यक्तींचा सर्वांगीण विकास ही शक्य नाही. शिक्षणाचे महत्त्व दोनशे वर्षापूर्वी तत्कालीन थोर समाज सुधारकांनी जाणले. समाजातील तळागाळातल्या घटकांना शिक्षण क्षेत्राची दारे बंद होती. शिक्षण नसल्यामुळे तळागळातल्या या जनसामान्यांचे जीवन अगदी तुच्छ लेखल्या जात होते. या घटकांना पदतुल्य समजल्या जात होते.

शिक्षण घेणे ही काही ठराविक लोकांचीच मक्तेदारी समजल्या जात होती. यामुळे पशु समजीवन जगणाऱ्या लोकांच्या व्यथा व कथा त्या काळच्या समाज हितचिंतकांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. या दीन दुबळ्यांचे लाचारीचे जीवन बघून या समाज हितचिंतकांनी या जनसाम ान्यांसाठी शिक्षण मिळावे म्हणून शाळा उघडल्या. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे उघडली. गोरगरीब व दीन दलित-दुबळ्यांच्या मुलामुलींसाठी शिष्यवृत्ती योजना आरंभ केली. दत्तक पालक योजना आरंभ केली. अशा थोर शिक्षणतज्ज्ञात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतल्या जाते.

'एकवर्षासाठी जगायचे असेल तर धान्य पेरा, दहावीस वर्षाची तरतूद करावयाची तर फळ झाडे लावा, शंभर वर्षासाठी तरतूद करावयाची असेल तर माणसे निर्माण करा,' असा महान संदेश देणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी वारणा नदीच्या काठावरील कुंभोज या गावी झाला. त्यांच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती होता. भाऊरावचे वडील पाईगोंडा पाटील यांचा आग्रह होता की, त्यांच्या मुलां-मुलींना चांगले शिक्षण मिळावे. त्यांनी आपल्या मोठ्या मुलाला म्हणजे भाऊरावला प्राथमिक शिक्षणपूर्ण झाल्यावर कोल्हापूरला पुढील शिक्षणासाठी पाठविले. कोल्हापूरला गेल्यावर भाऊराव सत्यशोधक समाजाच्या प्रभावाखाली आले. जातीच्या आधारावर लोकांमध्ये भेदभाव करणे पसंत नसलेल्या भाऊरावांना जोतीबांचे लेखन, विठ्ठल रामजी शिंदे यांचे विविध कार्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अस्पृश्यता निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या जोरदार मोहिमेने



प्रेरणा दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वत:ला शिक्षण कार्यासाठी झोकून दिले. समाजातील दीन दुबळे दलित, शोषित, पिडीत आदी मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडली आणि समाजातील प्रत्येकाला शिक्षण मिळालेच पाहिजे, अशी म हात्मा फुलेंची परंपरा पुढे चालविली.

१९१९ साली रयत शिक्षण संस्था स्थापन केली- भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्र्याची व गरिबीची पाहणी केली. ग्रामीण भागातील तत्कालीन समाजात अत्यंत गरिबीची व दयनीय अवस्थेचे जीवन जगत होते. ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात अज्ञानी होते. या लोकांचे दारिद्र्य म्हणजे त्यांना अज्ञानपणा हे भाऊराव पाटील यांनी जाणले. या लोकांचे दारिद्र्य घालवायचे असेल तसेच त्यांच्या जीवनातील अनंत समस्या दूर करावयाच्या असतील तर त्यांना शिक्षण देण्याशिवाय पर्याय नाही. हा विचार त्यांच्या मनात आला आणि जनतेला शिक्षण मिळवून देणे हे आपले जिवीत कार्य मानले. शतकानुशतके शैक्षणिक सुविधांपासून वंचित असलेल्या दीनदुबळ्या गरीब जनतेला शिक्षण मिळवून देण्याकरिता त्यांनी १९१९ साली रयत शिक्षण संस्था स्थापन केली.

शाळा महाविद्यालये स्थापन करून चालणार नव्हते तर त्यासाठी विद्यार्थी वर्ग महत्त्वाचा होता म्हणून भाऊराव पाटील यांनी गावोगावी फिरून शेतकरी, दीनदुबळे यांची मनं वळवून त्यांच्या मुला-मुलींना शाळा महाविद्यालयात त्यांना दाखल केले. विद्यार्थ्यांना अशा प्रकारे एकत्रित आणून जीवनातील शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटवून सांगितले. अशा प्रकारे सामाजिक बंधुत्वाचे चित्र त्यांनी साक्षात घडविले व सामाजिक सुसंवाद प्रथम निर्माण केला.

जात व पंथ विरहित वसतीगृह- भाऊराव पाटील यांना जात व पंथाच्या नावावर प्रवेश देणारे वसतीगृह पसंत नव्हते म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या सहाय्याने जात व पंथ लक्षात न घेता सर्वांना प्रवेश देणारे वसतीगृह आरंभ करून ग्रामीण भागातील गोरगरीब व सर्व जाती पथांच्या मुलांना तेथे प्रवेश दिला. याबाबत एक वैशिष्ट असे की त्यांनी वसतीगृहात प्रवेश दिलेला पहिला मुलगा 'महार' जातीचा होता. याबाबत त्यांना समाजाकडून कडाडून विरोध झाला परंतु विरोधाला न जुमानता त्यांनी हे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले व सर्व जाती, धर्म पंथाच्या मुलामुलींना शिक्षण मिळवून दिले.

प्रत्येक गावात शाळा असावी- गाव तेथे शाळा असावी असे त्यांचे मत होते. एवढेच नव्हे तर या शाळेत प्रशिक्षित शिक्षक असावे तरच चांगल्या प्रकारचे गुणवत्ता पूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल, असा त्यांचा ठाम विश्वास होता आणि म्हणूनच त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्यामार्फत गाव तेथे प्राथमिक शाळा उघडण्यावर व प्रशिक्षण विद्यालये उघडण्यावर भर दिला व तो पूर्ण ही केला. शालांत शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून भाऊराव पाटील यांनी महाविद्यालयांचे जाळेही निर्माण केले.

स्त्री शिक्षणाला प्राधान्य- महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांच्या सारखेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुद्धा स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले. मुलींनाही प्राधान्य क्रमाने शाळा महाविद्यालयात प्रवेश देवून स्त्री शिक्षणाला प्रोत्साहित केले.

भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अंतिम हेतू पिळवणूक रहित शिक्षण व एकसंघ भारतीय समाज निर्मितीचा होता. शिक्षणाब रोबर आंतर विवाहासही त्यांनी प्रोत्साहन दिले. अनेक जाती-एक वसतीगृह राबविणारे ते पहिले भारतीय होते.

कमवा आणि शिका- विद्यार्थ्यांना त्यांनी 'कमवा आणि शिका' असा स्वावलंबनाचा पाठ दिला. अगोदर कष्ट करायचे थोडा पैसा जमा करायचा व त्याच्या जोरावर शिक्षण घ्यायचे या विचारांचा त्यांनी गावोगावी फिरून प्रसार केला आणि लोकांमध्ये जागृती निर्माण करून शैक्षणिक कार्यासाठी कर्मवीरांनी मदत मिळविली. आम्हाला पडिक जमीन द्या आम्ही तिचे सुपीक जमिनीत रूपांतर करू, अशी क्रांतीकारी घोषणा भाऊराव पाटील यांनी केली. भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसारात व सामाजिक चळवळीत केवळ भाषणेच केली नाहीत तर प्रत्यक्ष ती कृतीत उतरविली. शाळेत मुलांच्या स्वाध्यायावर भर तर दिलाच याशिवाय शेती हिशोब, प्रशासन यासारखे विषय अभ्यासक्रमात ठेवले.

कमवा आणि शिका व स्वावलंबी शिक्षण ही रयत शिक्षणाची मुलभूत तत्वे होत. कर्मवीरांना खरोखर विद्येचे शिक्षणाचार्य म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव व २६ जानेवारी १९५९ साली प्रजासत्ताक दिनापासून झाला.

भारत सरकारने त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल पदमभूषण पुरस्कार मोठ्या आदर व सन्मानाने बहाल केला. त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे लावलेले इवलेसे रोपटे आज प्रचंड वृक्षाच्या रूपात वाढलेले आहे.

कर्मवीरांनी शिक्षणाचा बाजार केला नाही तर शिक्षण समाजाच्या प्रगतीसाठी प्रबोधनासाठी गुणवान समाज निर्मितीसाठी मानवी जीवनाच्या विकासासाठी व प्रगत करण्यासाठी वापरले. अशा या थोर शिक्षण महर्षीचे निधन ९ मे १९५९ रोजी पुणे येथे झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाऊरावांना विनम्र आदरांजली!

**-धोंडिरामसिंह राजपूत**

# राष्ट्रनिष्ठा आणि धैर्याचे प्रतीक- महाराणा प्रतापसिंह

**भारत** देश महान योध्याचा देश आहे. प्रखर राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, जनप्रेम,व मातृभूमीला प्राणा पलीकडे जपणारे,योद्धे व राजे या भूमीतच जन्म ले आहेत. त्यांच्या कर्तृत्व पराक्रमाने इतिहासाची पाने सुशोभित झालेली आहेत. अशा या योध्दात मेवाडचे महाराणा प्रतापसिंह यांचे नाव अग्रस्थानी आहे.

मोगल साम्राटाशी झुंजणारे, त्यांना जेरीस आणणारे, त्यांच्या सैन्याला आपल्या युद्ध कौशल्याने सळो की पळो करून सोडणारे महाराणा प्रतापसिंह म्हणजे देशाभिमान व स्वाभिमानाचे कणखर उदाहरण होय, मोगलांच्या मानाने अत्यंत कमी सैन्यबळ तुटपुंजी युद्ध सामुग्री, आर्थिक स्थितीही बेताचीच, परंतु एव्हढे सर्व तुलनेने कमी असतानाही त्यांनी आत्मविश्वास, धैर्य व जिद्दीने केलेला सामना व मिळिवलेले विजय इतिहासाच्या पानांची आन, बान-शान वाढविणारे आहे. स्वकीयांचा धोकेबाजपणा, लबाडी व खेकडावृत्ती यामुळे ही महाराणा प्रतापसिंह सारख्या महान योध्याला अनेक चढ उताराना सामोरे जावे लागले. स्वकीयांनी म ोगलांच्या दरबारी पत्करलेली लाचारी, गुलामगिरी व आप्तेष्टशी शत्रुत्व हे तत्कालीन परिस्थितीचे वास्तव चित्र होते. महाराणा प्रतापसिंह यांचा बाणा होता सर कट सकता है मगर झुक नहीं सकता' हा महाराणा सिंहाचा बाणा होता. त्यामुळे त्यांनी शत्रू पक्षाशी दोन हात करण्याची तयारी होती. अशा या महान योद्धयाच्या जीवनातील अनेक मूल्ये, त्यांची नीतिमत्ता, त्यांची स्वाभिमानी वृत्ती आजही आठवते. महाराणा प्रतापसिंह रानावनात राहिले. कंदमुळे सेवन केली. प्रसंगी गवताच्या भाकरी खाऊन पोटाची क्षुधा भागविली. पण मातृभुमीच्या रक्षणार्थ माघार व लाचारी पत्करली नाही, त्यांच्या मातोश्री जयवंतादेवी यांनी बालपणी त्यांना आदर्श शिक्षण, नैतीकतेचे पाठ शिकविले होते. १५७६च्या हल्दी घाटी युद्धात मोगलांच्या महिलांना कैदी बनविण्यात आले होते, त्यांनी संबधितास तात्काळ आदेश देऊन या महिलांना त्यांच्या कुटुंबियाकडे पाठवून दिले.

शत्रूपक्षाच्या महिलांशी स्वतःच्या आई व बहिणी प्रमाणे वागावे असे आदेश त्यांनी आपल्या सैनिकांना दिले होतें, महाराणा प्रतापसिंहाचे चारित्र्य अत्यत मंगल व पवित्र होते. यामुळे महाराणा प्रतापसिंहांचे देहावसान झाल्यावर अकबराचे डोळे भरून आले, 'तेंव्हा तो म्हणाला' एक चारित्र्यवान राजपूताने या जगाचा निरोप घेतला. आदिवासी बांधवाना सोबत घेऊन मोगलांशी लढा-स्वकीय शत्रू पक्षाला जाऊन मिळाल्यावर राणा प्रतापसिंह यांनी देशाचे मूळ रहिवाशी यांच्या हृदयात देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा व मातृभूमी प्रेम जागृत करून त्यांच्या सहाय्याने महाराणा प्रतापसिंह यांनी मोगलांशी दीर्घ काळ लढा दिला. महाराणा प्रतापसिंह यांनी राष्ट्रीय मूल्ये प्राणा पलीकडे जपली, त्यांनी राष्ट्रहित व मातृभूमी ला प्रथम प्राधान्य दिले. त्यांनी राष्ट्रहिता पुढे सर्व बाबी तुच्छ मानल्या. राणा प्रतापसिंह म्हणजे राष्ट्रीय एकता, अखंडता, बंधुता, व समतेचे आदर्श मानले जातात, स्वाभिमानाने जगण्याचा पाठ त्यांनी संपूर्ण जगताला शिकविला सर कट सकता, मगर झुक नही सकता हे त्यांनी आपल्या स्वाभिमानाने जगताला दाखवून दिले. देश व मातृभूमी साठी सर्वस्व त्यागणारा महाराजा -महाराणा प्रतापसिंह यांनी राष्ट्राला सर्वस्व मानले. मातृभूमी रक्षण, देशावर येणाऱ्या प्रतेज संकटाचा सामना करण्यासाठी घर, सुख, वैभवाचा त्याग करण्याची वेळ आली तरी चालेल पण राष्ट्राहितासाठी एकजूट होऊन राष्ट्राप्रती प्रतेक घटकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्याचा पाठ त्यांनी देशवासीयांना दिला अशा महान योद्धया च्या स्मृतींना कोटी, कोटी प्रणाम.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

### महाराणा प्रतापसिंहांची कीर्ती

महाराणा प्रतापसिंहांची जगी महान कीर्ती
राष्ट्रनिष्ठा, मातृभूमीची मिळे सर्वांना स्फूर्ती
मातृभूमी-राष्ट्रनिष्ठा असे त्यांच्या ठायी
भारतभूमी-भारतमाता हीच असे खरी आई
मातृभूमीच्या रक्षणार्थ लढा त्यांचा मोठा
स्वाभिमान-स्वातंत्र्याचा रचला त्यांनी ओटा
हल्दीघाटीच्या युद्धात युद्ध कौशल्य महान
भारत मातेसाठी लढले शूरवीर भारतीय जवान
राणाजींचा संघर्ष- लढा राणाजींचा स्वाभिमान
यामुळे भारताची आजही जगात असे मोठी शान
सूर्य-चंद्र राहतील जगात जोपर्यंत
राणाजींची कीर्ती राहील तोपर्यंत
जय राणा! जय महाराणा!! म्हणू आपण सारे
देशात वाहतात सर्वत्र प्रतापसिंहांच्या शौर्याचे वारे

**- धोंडीरामसिंह ध राजपूत**

# श्री काळाराम मंदिरात धर्मध्वज उभारणी सोहळा संपन्न

नाशिक, दि. ७ (प्रतिनिधी) - आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ च्या पार्श्वभूमीवर पंचवटीतील ऐतिहासिक श्री काळाराम मंदिरात बुधवारी धर्मध्वज उभारणी सोहळा पार पडला. अयोध्येच्या धर्तीवर उभारलेल्या २१ फूट उंच पंचधातूच्या धर्मध्वजस्तंभावर भगवा धर्मध्वज विधिवत पूजन करून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फडकविण्यात आला.



पंचधातूपासून तयार केलेल्या धर्मध्वजस्तंभावर ११ बाय ५ फूट आकाराचा भगवा ध्वज आहे. त्यावर हनुमंतरायांची प्रतिमा तसेच सूर्यदेवतेचे 'ॐ' चिन्ह अंकित करण्यात आले आहे. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि पारंपरिक अलंकरण करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला औपचारिक धार्मिक प्रारंभ झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महापौर हिमगौरी आडके-आहेर, अयोध्या न्यासाचे कोशाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, महंत सुधीरदास पुजारी उपस्थित होते. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि पारंपरिक अलंकरण करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला औपचारिक धार्मिक प्रारंभ झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला आमदार पंकज भुजबळ, आमदार सीमा हिरे, 'फिक्की'चे अध्यक्ष मिलिंद कांबळे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण (मालेगाव), अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील (नाशिक), निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, उपमहापौर विलास शिंदे, पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, शांताराम शास्त्री भानोसे, स्वामी अमृतानंद, वैष्णव व शैव आखाड्यांचे महंत, विश्वस्त शांताराम आवसारे, शुभम मंत्री, साधू-महंत आदी उपस्थित होते.

# स्वाभिमानी व महान योध्दा महाराणा प्रतापसिंह

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी, मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहानभूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावीत झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रताप यांना मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्या काळी म ुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापांचा अभिमान आहे. महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह. मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचा राजा झाला.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षानी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहाचे निधन झाले.यानंतर मेवाडचे सुत्र महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतीकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहचू नये,म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरीक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी म ानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असतांना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रताप यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतः च्या समशेच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी म ोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी रजपूतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा संग ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहच्या मनात खटकले आणि म हाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईन. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंग व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाले.राणाजींच्या वक्तव्य नेहमीच मानसिंहला खटकत होते.ही संपूर्ण घटना अकबराला म ानसिंहाने सांगितली.पहिलेच मानसिंग तिलमिला झाला आणि अकबराला मेवाड पाहिजे होते या करीता अकबर सर्वत्र जहर घोळत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युध्द करायल निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जार्णाया मानसिंगाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचशे सैनिक धाराशाही केले. दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापांच्या भितीने मानसिंग आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रताप जखमी झालेले पाहुन मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापाचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले. मानसिंहाला महाराणा प्रताप समजून मोगलांनी आक्रमन केले. अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीला प्राप्त झाला.तेवढ्यात शत्रू सैनिकाने राणाजींच्या घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय नीकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहाले.तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तिसिंग व त्यांचा बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन याच्या अभावामुळे मी जरी म ोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र तो महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दिघाटीतील युद्ध हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमण करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रताप यांना पकडू शकला नाही. अशा प्रकारे प्रबळ महत्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापाला नमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण तो निष्फळ ठरला.

२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने)महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मालवली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिम ान यासाठी आजही मानाने घेतले जाते.महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# लेखाविषयक प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - विभागाच्या लेखा व कोषागारे संचालनालयांतर्गत विभागीय सहसंचालकामार्फत लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी लेखा लिपीक, पर्यवेक्षकीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण २० एप्रिल ते १ जुलै या कालावधीत होत असून विभागातील शासकीय कार्यालयांनी आपल्या लेखा कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणासाठी पाठवावे असे आवाहन लेखा व कोषागारे विभागाच्या सह संचालक रेहाना अ काझी यांनी केले आहे. या ५० दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ात लेखा, वित्त व शासनाच्या विविध संगणक प्रणालींचा समावेश असून त्या विषयाची निश्चित केलेला तपशिलवार अभ्यासक्रम विभागातील सर्व कोषागार अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहे. या प्रशिक्षणासाठी इच्छुक शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवेश देण्यात येईल.प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचे आवेदन पत्र व कार्यालय प्रमुखाचे शिफारस पत्र पाठवावे. तसेच गट क इच्छुक कर्मचारी व नवनियुक्त कर्मचारी यांनाही अभ्यासक्रम ासाठी प्रवेश घेता येईल. विशिष्ट मोड्युलसाठीही प्रवेश घेण्याची अनुमती देता येईल. तरी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय कार्यालयीन प्रमुखांना त्यांच्याकडील गट क तसेच लिपीक वर्गीय कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे असे आवाहन सहसंचालक रेहाना काझी यांनी केले आहे.

# विभागीय लोकशाही दिनाचे ११ मे रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे मे महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ११ मे, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत.

अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.

जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनाम ध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळिवले आहे.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत कुस्ती, खो-खोमध्ये महावितरण संघाला विजेतेपद

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - दि. ८ मे २०२६: येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये सुरु असलेल्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत म हावितरणने कुस्तीच्या १० वजन गटामध्ये ५ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई करीत सांघिक विजेतेपद मिळवले. तर महावितरणच्या खो-खो संघाने या स्पर्धेवर एकतर्फी वर्चस्व ठेवत विजेतेपदकाची अपेक्षित कमाई केली. तसेच बास्केटबॉलच्या अंतिम लढतीत पंजाब संघाने विजेतेपद मिळवले.

एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत शुक्रवारी कुस्तीच्या १० वजनगटाम ध्ये शुक्रवारी (दि. ८) अंतिम सामने झाले. यात विविध वजनगटानुसार अनुक्रमे विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे. ५७ किलो- १) सुदर्शन पाटील (म हावितरण) व जर्नेलसिंग (हिमाचल प्रदेश), ६१ किलो- अश्विन मोरे (महावितरण) व सुरेश कुमार (हरियाणा), ६५ किलो- राजकुमार काळे (म हावितरण) व अजय कुमार (हिमाचल प्रदेश), ७० किलो- रणवीरसिंग (पंजाब) व आनंद नागरगोजे (महावितरण), ७४ किलो- सुखबीरसिंग (हिमाचल प्रदेश) व नरेंदरसिंग (पंजाब), ७९ किलो- अखिल मुजावर (महावितरण) व शेरोसिंग (पंजाब), ८६ किलो- अजय कुमार (हिमाचल प्रदेश) व दीपक कुमार (राजस्थान), ९२ किलो- बलवीरसिंग (हिमाचल प्रदेश) व अरूण गौड (हरियाणा), ९७ किलो- अमोल गवळी (महावितरण) व मदन (हरियाणा), १२५ किलो- विजेंदरसिंग (हिमाचल प्रदेश) व प्रमोद ढेरे (महावितरण).

यानंतर महावितरण विरुद्ध हरियाणा पॉवर संघामध्ये खो-खोची अंतिम लढत झाली. यात भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह निशिकांत शिंदे, विराज कोटमकर, महेंद्र पाटील यांनी महावितरणच्या आक्रमण व संरक्षणामध्ये आक्रमकता कायम ठेवली आणि हरियाणा पॉवर संघाचा दोन गुण आणि एक डाव राखून एकतर्फी विजय मिळवला. कबड्डीमध्ये महावितरणने अंतिम फेरीत प्रवेश केला असून तुल्यबळ व मागील विजेता हिमाचल प्रदेशशी लढत होणार आहे. महावितरणने बीएसईएस दिल्ली संघाचा ३६ विरुद्ध १० असा एकतर्फी पराभव करीत अंतिम फेरी गाठली. तर हिमाचल प्रदेशने हरियाणा पॉवर संघाचा ४८ विरुद्ध २८ असा पराभव करीत अंतिम फेरीमध्ये महावितरणला आव्हान दिले आहे.

बास्केटबॉलच्या अंतिम सामन्यात पंजाब संघाने (४५) हरियाणा संघाला (३०) १५ गुणांनी विजय मिळवत स्पर्धेतील विजेतेपद मिळवले. पंजाबकडून हरप्रित सिंग यांनी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर तृतीय स्थानासाठी अत्यंत चुरशीच्या व शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा निर्माण झालेल्या बास्केटबॉलच्या लढतीत म हावितरण संघाने (२३) राजस्थान संघाचा (२१) केवळ २ गुणांनी पराभव केला. महावितरणकडून भारत मराठे यांनी शेवटच्या क्षणाला दोन गुणांची कमाई करीत संघाला विजयी केले. या लढतीत कृष्णा लाड, किशोर सपकाळे यांनीही चमकदार कामगिरी केली.

# समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे -सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

## सामजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन



पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) - सामाजिक न्याय विभागाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस बदलत आहे, आगामी काळातही काम ात सातत्य ठेवून समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी आणखीन चांगले काम करावे; 'सामाजिक न्याय' संकल्पना डोळ्यासमोर ठेवून समाजातील शेवटच्या घटकांना न्याय देण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्यवतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लोणावळा येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, सामाजिक न्याय खात्यातील सहसचिव सो.ना. बागुल, उपसचिव वर्षा देशमुख, अवर सचिव सतीश खैरमोडे, राज्यातील प्रादेशिक उपायुक्त, सहायक उपायुक्त उपस्थित होते.

श्री. शिरसाट म्हणाले, विभागाच्यावतीने विद्यार्थी घडविण्याचे फार मोठे काम करण्यात येते. विद्यार्थीच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी वसतिगृहाचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे राज्यात वसतिगृह उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृहाम ध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करुन त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्यात यावा.

विभागामध्ये चांगले काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. त्यांनीही विभागात आपल्या कामाच्या माध्यमातून वेगळी छाप निर्माण करावी, राज्याला दिशादर्शक होईल यादृष्टीने नवनवीन उपक्रम राबवावेत, या उपक्रम ाचे इतरांनी अनुकरण करण्याची गरज आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता कार्यालयाच्याजवळ निवासस्थान उपलब्ध करण्यासोबतच सोसायटी स्थापन करण्याबाबत नियोजन करावे.

कार्यशाळा ही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या विचारांची देवाण-घेवाण तसेच त्यांच्या अडीअडचणी मांडण्याची व्यासपीठ आहे, त्यामुळे या कार्यशाळेचा आनंद घेत विचाराची देवाण-घेवाण करावी. याठिकाणी झालेले निर्णय, चर्चे च्या अनुषंगाने विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करून आगामी सकारात्मक परिणाम दिसले पाहिजे. राज्याच्या अर्थसंकल्पात विभागासाठी मंजूर झालेला निधी वेळेत खर्च होईल, यादृष्टीने काम करावे, असेही शिरसाट म्हणाले.

प्रधान सचिव डॉ. कांबळे म्हणाले, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. विभागाच्यवतीने समाजातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, नागरिक आदी घटकांसाठी लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी काम करावे. येत्या काळात शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योजकता, सामजिक सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर या पाच पैलूंवर काम करुन विभागाची धोरण ठरविण्यात येणार आहे, त्यामुळे विभागाने विकसित महाराष्ट्र २०२७ चा दृष्टिकोन समोर ठेवून प्रभावीपणे काम करावे, असेही डॉ. कांबळे म्हणाले.

श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागावतीने येत्या काळात नवनवीन धोरणे, योजना राबविण्याचा मानस आहे. केंद्र सरकारच्या 'आय-गॉट' संकेतस्थळाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. अधिकारी-कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा या वर्षी प्रथमच आयोजित करण्यात आल्या, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऊसतोड कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि तृतीयपंथीयांच्या कल्याकरिता काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, या कार्यशाळेचा विभागाला निश्चित उपयोग होईल, असेही श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या. यावेळी दिवसभर विविध योजनांच्या संदर्भात प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी सादरीकरण केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार बार्टीचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

# नाशिक धर्मांतर प्रकरणी एमआयएम नगरसेवकाने निदा खानला आश्रय दिल्याची माहिती; पोलिसांची नोटीस, मोबाईल जप्त

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - नाशिकच्या बहुचर्चित टीसीएस धर्मांतर व लैंगिक शोषण प्रकरणातील एक आरोपी असणाऱ्या निदा खानला छत्रपती संभाजीनगर येथील एम आयएमच्या एका नगरसेवकाने लपवून ठेवले होते अशी धक्कादायक बाब समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी सदर नगरसेवकाला नोटीस बजावून त्याचा मोबाईलही जप्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची मूळे आणखी खोलवर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नाशिकमधील ढउड प्रकरण समोर आल्यापासून पोलिस निदा खानच्या शोधात होते. ती गत २५ मार्चपासून फरार होती. पोलिसांच्या वेगवेगळ्या पथकाने तिचा शोध सुरू ठेवला होता. पण ती वारंवार आपले लोकेशन बदलत होती. तिचे जवळचे नातेवाईक तिला लपण्यासाठी मदत करत होते. याच काळात ती अटकपूर्व जामिनासाठीही प्रयत्न सुरू केला होता. पण कोर्टाने तिला कोणताही दिलासा देण्यास साफ नकार दिला होता. अखेर ती छत्रपती संभाजीनगर येथील एका घरात लपून बसल्याची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी वेगवान कारवाई करत तिला बेड्या ठोकल्या.

निदा खानला बेड्या ठोकल्यानंतर पोलिसांनी तिला आश्रय देणाऱ्यांचा शोध सुरू केला आहे. त्यात एमआयएमचे स्थानिक नगरसेवक मतीन पटेल यांनी तिला लपण्यासाठी मदत केल्याची बाब पोलिस तपासात निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी मतीन पटेल यांना नोटीस बजावून त्यांचा मोबाईल जप्त केला आहे. विशेष म्हणजे निदा खान गत ५ दिवसांपासून संभाजीनगरमध्ये राहत होती. ती संपर्कात आल्यानंतर मतीन पटेल यांनी २ महिन्यांपूर्वी नारेगाव येथील कौसर पार्क परिसरात एक नवे घर विकत घेतले होते. या घरात त्यांनी दिला ठेवले होते.

# इंद्र आणि कुबेर यांचा दरबारी : तुंबुरू मुनी

तुंबरू किंवा तुंबुरू जयंती ही गंधर्वांचे राजे आणि भगवान विष्णूंचे परम भक्त, सर्वश्रेष्ठ गायक तुंबरू यांची जयंती म्हणून साजरी केली जाते. तुंबुरु मुनी हे महर्षी कश्यप आणि त्यांची पत्नी प्रधाचे पुत्र असल्याचे वर्णन केलेले आढळते. कश्यपाचे इतर तीन गंधर्व पुत्र, बहू, हाहा आणि हुहू यांच्यासोबत, तो त्याच्या मधुर आणि सुखद वाणीसाठी प्रसिद्ध आहे... अधिक रोचक व ज्ञानवर्धक संकलित माहितीचा सदर श्रीकृष्णदास- बापू निरंकारी यांचा लेख जरूर वाचा... संपादक.

तुम्बुरुला त्याच्या संगीताच्या प्रतिभेमध्ये गंधर्वांमध्ये सर्वोत्कृष्ट मानले जाते. एक 'महान गायक आणि संगीतकार', तो देवांच्या उपस्थितीत गातो. नारद आणि गोप यांच्या व्यतिरिक्त, त्याला गाण्यांचा राजा म्हणूनही ओळखले जाते.

नारदासोबतची स्पर्धा: भागवत पुराणात नारदांना टुम्बुरुचे गुरू मानले आहे. शास्त्रामध्ये उल्लेख आहे की टुम्बुरु त्यांच्यासोबत युधिष्ठिराच्या दरबारात गेले होते. नारद आणि टुम्बुरु विष्णूची स्तुती गातात, असे म्हटले जाते. अद्भुत रामायणात उल्लेख आहे की तुम्बुरु सर्व गायकांमध्ये श्रेष्ठ होता आणि विष्णूने त्याला बक्षीस दिले. विष्णूचा भक्त असलेल्या नारदाला तुम्बुरुचा मत्सर वाटू लागला. विष्णूने नारदाला सांगितले की, नारदाने केलेल्या तपश्चर्येपेक्षा तुम्बुरुला स्तुतिगीते अधिक आवडत असल्यामुळे तो त्यांना जास्त प्रिय होता. त्यांनी नारदाला संगीत शिकण्यासाठी गणबंधू नावाच्या घुबडाकडे पाठवले. घुबडाकडून शिकल्यानंतर, नारद तुम्बुरुवर विजय मिळवण्यासाठी निघाला. जेव्हा तो तुम्बुरुच्या घरी पोहोचला, तेव्हा त्याने पाहिले की तुम्बुरु जखमी स्त्री-पुरुषांनी वेढलेला आहे, जे त्याच्या मते, त्याच्या खराब गायनामुळे जखमी झालेले संगीतकार राग आणि रागिणी होते. अपमानित होऊन नारद निघून गेला आणि अखेरीस त्याने प्रथम देव कृष्णाच्या द्वितीय पत्नी, जांबवती आणि सत्यभामा आणि नंतर त्याची आवडती पत्नी रुक्मिणी यांच्याकडून सात स्वर शिकून त्या गंधर्वांच्या प्रतिभेला मागे टाकले.

रामेश्वरम येथे राम आणि त्यांची पत्नी सीता लिंगाची पूजा करत असताना, तुम्बुरु (डावीकडून दुसरे, उभे) यांच्यासोबत (डावीकडून) लक्ष्मण, नारद, विभीषण पाहत आहेत. तुम्बुरुचा उल्लेख स्वर्गाचा राजा इंद्र तसेच संपत्तीचा देव कुबेर यांचा दरबारी म्हणून केला जातो. त्याचे वर्णन कुबेराचा अनुयायी म्हणूनही केले जाते; असे म्हटले जाते की गंधमंदन पर्वतावरील कुबेराच्या निवासस्थानाजवळून जाताना सहसा त्याची गाणी ऐकू येतात. तुम्बुरुचे वर्णन कुबेराचा विशेष मित्र म्हणून केले जाते आणि तो गंधर्वांना संगीत आणि गायनामध्ये म ार्गदर्शन करतो, जे गंधर्व आणि किन्नरांद्वारे केले जाते. तुम्बुरुचे वर्णन हाहा-हुहू, पर्वता, चित्ररथ यांसारख्या इतर स्वामींसोबत 'गंधर्वांचा स्वामी' म्हणून केले जाते. तुम्बुरुचा उल्लेख कधीकधी गंधर्व ऐवजी मुनी (ऋषी) म्हणून केला जातो. तुम्बुरु गंधर्वांना माणसांची युद्धे पाहण्यासाठी घेऊन जातो आणि देवर्षी नारदांसोबत पूजा करण्यासाठी मेरू पर्वतावर जातो, असेही वर्णन केलेले आहे.

नाते संबंध: तुंबुरुला अप्सरा- दिव्य नर्तकी- रंभाचा गुरू म्हणूनही वर्णन केले आहे. कधीकधी तो तिच्याशी विवाहित असल्याचेही वर्णन केले जाते. त्याला 'गंधर्वांचा योद्धा वीर' मानले जाते, 'तरीही प्रेमाला बळी पडणाऱ्या काही मोजक्यांपैकी एक'. दुसऱ्या एका संदर्भानुसार, त्याला मनोवती आणि सुकेशा नावाच्या दोन मुली आहेत, ज्यांना एकत्रितपणे पंचचूडा म्हटले जाते आणि त्या चैत्र आणि मधु (वैशाख) महिन्यांत सूर्याच्या रथावर स्वार होतात. तुंबुरु मधु आणि माधव (माघ) म हिन्यांचा अधिपती असल्याचे म्हटले जाते.

दक्षिण भारतीय परंपरा: दक्षिण भारतात, टुम्बुरुला अनेकदा घोड्याच्या चेहऱ्याचा दाखवले जाते. तो वीणा हे वाद्य धरतो, जे तो गाताना वाजवतो. दुसऱ्या हातात तो लाकडी टाळ धरतो, ज्याला तो ताल राखण्यासाठी वाजवतो. एका दक्षिण भारतीय आख्यायिकेनुसार, टुम्बुरुने एकदा कठोर तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न केले. टुम्बुरुने शिवाकडे विश्वप्रवास, संगीत आणि गायनातील कौशल्य, तसेच शिवासोबत राहून त्याची सेवा करण्याची क्षमता मागितली. शिवाने त्याला आशीर्वाद दिला आणि त्याने मागितलेले वरदान दिले, असे पुराणात वर्णन आढळते. (विविध सम ाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !)


!! तुंबुरू जयंतीच्या समस्त भगवत भक्तांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन-
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
रा. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

# संजय दत्त स्टार 'आखरी सवाल'चा ट्रेलर प्रदर्शितः आपल्या इतिहासातील ते न ऐकलेले सत्य समोर, ज्याकडे देशाने आतापर्यंत केले दुर्लक्ष!

'आखरी सवाल'चा ट्रेलर थेट व्यवस्थेवर प्रहार करतो आणि देशाने कधीच विचारण्याची हिंमत न केलेले कठोर प्रश्न समोर ठेवतो. दम दार संवाद आणि प्रभावी कथानकासह, हा निःसंशयपणे यावर्षातील सर्वात प्रभावशाली ट्रेलर्सपैकी एक ठरत आहे!

प्रभावी घोषणा आणि बोल्ड टीझरनंतर, संजय दत्त स्टार 'आखरी सवाल' २०२६ मधील सर्वात बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक म्हणून समोर आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संबंधित ऐतिहासिक घटनांवर गंभीर प्रश्न उपस्थित करून या चित्रपटाने आधीच चर्चेला सुरुवात केली होती आणि आता त्याचा ट्रेलर देशाला आणखी हादरवण्यासाठी समोर आला आहे.




चित्रपटात महात्मा गांधी यांच्या हत्येम ध्ये ठडड ची कथित भूमिका, बाबरी मशिद पाडण्याची घटना आणि आणीबाणी यांसारख्या संवेदनशील विषयांना हात घातला गेला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये आधीच तीव्र चर्चा सुरू झाली आहे. ट्रेलर आता या घटनांशी संबंधित कथित कटकारस्थानं आणि अनुत्तरित प्रश्नांच्या मुळाशी जात लपलेलं सत्य उघड करण्याचा प्रयत्न करतो. निर्भीड आणि स्पष्टपणे मांडलेला हा ट्रेलर अशा गंभीर चर्चेचं दार उघडतो, ज्यामध्ये प्रेक्षकांसमोर अनेक न ऐकलेले पैलू आणण्याचं आश्वासन दिलं आहे.

संजय दत्त या संपूर्ण कथानकाच्या केंद्रस्थानी असून, ते दमदार संवादांद्वारे ठडड वर झालेल्या आरोपांना उत्तर देताना दिसतात आणि या तीव्र चर्चेला अधिक धार देतात. हा चित्रपट समीरा रेड्डीच्या पुनरागमनाचाही साक्षीदार ठरत आहे, ज्या आपल्या अभिनयाने खोल प्रभाव पाडताना दिसतात. नमाशी चक्रवर्ती, अमित साध, नीतू चंद्रा आणि त्रिधा चौधरी यांसारख्या कलाकारांनीही या रोमांचक ट्रेलरची तीव्रता अधिक वाढवली आहे. याशिवाय, राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक अभिजीत मोहन वारंग यांचे प्रभावी दिग्दर्शन स्पष्टपणे जाणवते, ज्यांनी ही कथा प्रामाणिकपणे, निर्भीडपणे आणि विश्वासाने साकारली आहे.

प्रभावी दृश्यं, ताकदीचे संवाद, उत्कृष्ट अभिनय आणि भारताच्या इतिहासाशी संबंधित सत्याचा शोध घेणाऱ्या कथेसह 'आखरी सवाल'चा ट्रेलर खोल प्रभाव टाकतो. यासोबतच, हा चित्रपट एक मोठा टप्पा पार करत बधिर (वशरष) प्रेक्षकांसाठी इंडियन साइन लँग्वेज सह प्रदर्शित होणारा पहिला हिंदी चित्रपट ठरत आहे. तसेच, दृष्टिहीन प्रेक्षकांसाठीही सम विशक अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढवत, या ट्रेलरने निश्चितच संपूर्ण देशाला काही गंभीर प्रश्न विचारण्यास भाग पाडले आहे.

'आखरी सवाल'चे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते अभिजीत मोहन वारंग यांनी केले आहे. निखिल नंदा प्रस्तुत या चित्रपटाचे निर्माते निखिल नंदा आणि संजय दत्त आहेत, तर पुनीत नंदा, डॉ. दीपक सिंह, गौरव दुबे आणि उज्ज्वल आनंद हे सह-निर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद उत्कर्ष नैथानी यांनी लिहिले आहेत. हा चित्रपट १५ मे २०२६ रोजी हिंदी, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्ये चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# राज्य थॅलेसेमियामुक्त करूया-राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

## 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' संकल्प सप्ताहाची सांगता; राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कार्यक्रम




छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियानाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यभर १ ते ८ मेदरम्यान 'संकल्प सप्ताह' उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त आयएमए हॉल, समर्थनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महाराष्ट्र थॅलेसेमियामुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. जनजागृती, समाजाचा सहभाग आणि आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून हा लढा सातत्याने सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये महिला व मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या पीसीओडी क्लिनिकचे ऑनलाईन उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला महानगरपालिकेच्या आरोग्य सभापती डॉ. सुनिता सोळंके, आरोग्य सेवांचे उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, राज्य आरोग्य शिक्षण संपर्क विभागाचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, थॅलेसेमिया विषयावर कार्य करणारे तज्ज्ञ डॉक्टर, सेवाभावी संस्था, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांचे पालक आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, थॅलेसेमिया हा गंभीर अनुवंशिक रक्तविकार असून भविष्यात थॅलेसेमियामुक्त पिढी निर्माण करण्यासाठी व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. थॅलेसेमियाग्रस्त बालके जन्माला येऊ नयेत यासाठी समाजाने जागरूक राहणे गरजेचे आहे. तसेच या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकांवर आणि रुग्णांवर वेळेत उपचार होऊन त्यांना सामान्य जीवन जगता यावे यासाठी शासन आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि बळकट करत आहे.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, राज्यात सध्या सुमारे १३ हजार थॅलेसेमिया रुग्ण आहेत. या रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपचारांसोबत अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी रुग्णांना प्रवास सवलत, वेळेत रक्त उपलब्धता आणि आवश्यक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

महिलांच्या आरोग्याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, नुकतेच राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले असून आतापर्यंत सुमारे ८० हजार महिलांनी त्याचा लाभ घेतला आहे. त्याच धर्तीवर आता पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आले असून राज्यातील महिला आणि मुलींच्या आरोग्यासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

कार्यक्रमात रक्तविकार तज्ज्ञ डॉक्टरांनी थॅलेसेमियाविषयी मार्गदर्शन केले. तसेच थॅलेसेमिया रुग्णांसाठी कार्य करणाऱ्या संस्था, पालक आणि रुग्णांनीही आपले अनुभव सांगितले.

यावेळी 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारे डॉक्टर, कर्मचारी, सेवाभावी संस्था, तसेच या आजाराचा यशस्वीपणे सामना करणारे रुग्ण आणि त्यांच्या पालकांचा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# पनीर की चीज ॲनालॉग? मेन्यू कार्डवर स्पष्ट उल्लेख बंधनकारक

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- पनीर आणि चीज ॲनालॉग हे दोन अन्नपदार्थ वेगवेगळे असून दोघांचेही पोषणमूल्य वेगवेगळे आहे. याबाबत ग्राहकाला स्पष्ट कल्पना यावी यासाठी मेन्यू कार्डवर तसा उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे हॉटेल्स, अन्न व्यावसायिक या नियमांचे पालन करणार नाही त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील यांनी कळविले आहे की, रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, केटरर्स, फास्टफुड विक्रेते इ. अन्न पदार्थ तयार करतांना त्यात पनीर ऐवजी चीज ॲनालॉगचा वापर करतात. तथापि, पनीर व चीज ॲनालॉग हे दोन वेगवेगळे पदार्थ आहेत. त्यांचे पोषणमूल्य वेगळे आहे.

पनीर हा दुधापासून बनवला जाणारा पदार्थ आहे. आणि चीज ॲनालॉग हे खाद्यतेल,स्टार्च, फुड ॲडीटीव्ह यांचा वापर करुन तयार केले जाते.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नियम व नियमने २०११ अन्वये चीज ॲनालॉगच्या उत्पादन, विक्रीला किंवा वापराला बंदी नाही मात्र जे ग्राहक हा पदार्थ अन्न म्हणून ग्रहण करतात त्यांना हा पदार्थ खाण्या/ वापरण्याबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी अन्नपदार्थातील घटकांची माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम २०२० नुसार अन्न व्यावसायिकांनी अन्न विक्री करतांना संबंधित पदार्थाची पोषण घटकांची माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व अन्न व्यावसायिकांना आपल्या आस्थापनांचे मेन्यू कार्ड, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले इ. ठिकाणी चीज ॲनालॉग बाबत स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक आहे.

याबाबत दि.१ मे पासून हॉटेल्स, केटरर्स, रेस्टॉरन्ट्स असा अन्न व्यावसायिकांच्या तपासणी करण्यात येणार आहेत. चीज ॲनालॉगबाबत निर्देशांचे पालन न झाल्यास कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे. सह आयुक्त (अन्न) यांचे पथक ही कारवाई करतील. तसेच पनीर व चीज ॲनालॉग हे दोन वेगवेगळे पदार्थ असल्याबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# मनपा शाळांचा ८० टक्के निकाल; मुकुंदवाडी शाळेची विद्यार्थिनी ९४.६०टक्के घेऊन आली प्रथम

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत एकूण १७ शाळा माध्यमिक आहेत या माध्यमिक शाळेमधून ७९६ विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती त्यामधून ६३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत एकूण महानगरपालिकेच्या शाळेचा निकाल एकूण ७९.६५टक्के लागला असून मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा किरॉडपुरा नंबर एक या शाळेचा निकाल सर्वात जास्त ९४.८२टक्के लागला आहे.

त्या खालोखाल प्रियदर्शनी इंदिरानगर या शाळेचा निकाल ९३.९३टक्के लागला आहे त्या खालोखाल मिटमिटा या शाळेचा निकाल ९२.५०३ लागला आहे तसेच नारेगाव उर्दू या शाळेचा निकाल ९०.४४ टक्के लागला आहे या सर्व मुकुंदवाडी या शाळेतील ९४.६०टक्के घेऊन गौरी जगताप ही विद्यार्थिनी प्रथम आली आहे त्या नारेगाव उर्दू या शाळेची हुमेरा जमीला ही विद्यार्थिनी ९३.४०टक्के घेऊन दुसरी आली आहे आणि प्रथमेश बंडू मांदळे ९१.२०टक्के घेऊन हर्सूल या शाळेचा विद्यार्थी तिसरा आला आहे महानगरपालिकेच्या शाळेतील एकूण सहा विद्यार्थी ९०टक्के च्या वरती पास झाले आहेत तसेच ८१ टक्के घेऊन रगडे तनुजा ही दिव्यांग विद्यार्थिनी अंध विद्यार्थिनी सिडको एन ७ या शाळेतून पास झाली आहे या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन महापौर समीर राजूरकर उपमहापौर राजेंद्र जंजाळ माननीय सभापती स्थायी समिती सभापती माननीय सभागृहनेते गोविंदराव केंद्रे विरोधी पक्षनेता समीर साजिद यांनी केले तसेच आयुक्त अमोल येडगे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील व कल्पिता पिंपळे तसेच अंकुश पांढरे उप आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या सर्व विद्यार्थ्यांची खूप खूप अभिनंदन केले आहे.

सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत अशी माहिती भारत तिनगोटे शिक्षणाधिकारी अणि ज्ञानदेव सांगळे कार्यक्रमाधिकारी यांनी दिली आहे.

# मनपाच्या रुग्णालयात अत्याधुनिक 'गॅझेला एचबी इलेक्ट्रोफोरेसिस' मशीनचे लोकार्पण

## अवघ्या ८ मिनिटांत थॅलेसेमिया व सिकलसेल निदान शक्य

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विरोधीपक्ष नेते समीर साजिद, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभापती डॉ. श्रीमती सुनिता सोळुंके तसेच आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वतीने दिनांक ८ मे 'जागतिक थॅलेसेमिया दिन' सिडको एन-८ मनपा रुग्णालय येथे साजरा करण्यात आला.

भारतीय स्टेट बँकेच्या सीएसआर निधीतून प्राप्त ४ नवीन गॅझेला एचबी इलेक्ट्रोफोरेसिस मशीनचे लोकार्पण महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते हस्ते करण्यात आले. ही मशीन केवळ ८ मिनिटांत रक्ताच्या एका थेंबातून थॅलेसेमिया व सिकलसेल या रक्त विकाराचे निश्चित निदान होणार आहे. मशीन १००० चाचण्यांची नोंदीची साठवण क्षमता आहे. ८ हजार टेस्ट कार्ड मिळाले असून २२ हजार कार्ड सीएसआर फंड मार्फत मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आरोग्य विभागातर्फे १ ते ८ मे २०२६ दरम्यान 'थॅलेसेमिया संकल्प सप्ताह' राबविण्यात आला. ही अत्याधुनिक यंत्रणा थॅलेसेमियाचे जलद व अचूक निदान करण्यासाठी उपयुक्त ठरणार असून नागरिकांना आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या मशीनच्या माध्यमातून नागरिकांना कमी वेळेत अचूक तपासणी सुविधा उपलब्ध होणार असून थॅलेसेमियाचे वेळेत निदान व प्रतिबंध करण्यास मोठी मदत होणार आहे. शहरात प्रथमच अशी अत्याधुनिक मशीन मनपा आरोग्य केंद्र/ रुग्णालय येथे उपलब्ध झालेले आहे.

प्रत्येक गरोदर मातांची तपासणी करणे गरजेचे आहे. विशेषतः ज्या अति जोखमीच्या (गरोदर माता आहेत व ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे, त्यांच्या तपासण्या करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, जसे आपण विवाह जुळवताना पत्रिकेतील गुण पाहतो, त्याचप्रमाणे होणाऱ्या वधू-



वरांची HB Electrophoresis चाचणी करणेही गरजेचे आहे. जेणे करून जन्मतः थॅलेसेमिया असलेले बाळ जन्माला येण्या पासून प्रतिबंद करणे शक्य होईल.

या कार्यक्रमात महापौर समीर राजूरकर, सभापती स्थायी समिती अनिल मकरिये, सभापती वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती डॉ.सुनिता सोळुंके, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, भारतीय स्टेट बँकेचे प्रादेशिक अधिकारी पंकज कुमार, शाखा व्यवस्थापक इम्तियाज, माजी आय.एम.ए. सचिव डॉ. टाकळकर, नगरसेवक विश्वनाथ स्वामी, सौ.मीनाताई खरात, सौ. माधुरीताई आव्हाड, श्री. शिवाजी दांडगे, श्री. गणेश नवांदर, डॉ. महेंद्रसिंह चव्हाण, सहायक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे, डॉ. राठोडकर, डॉ. प्रेरणा संकलेचा, डॉ. शैलजा ताठे,डॉ. सनोबर फातेमा, असिस्टंट मॅट्रन श्रीमती मीनल ठोकळ यांची प्रमुख उपस्थिती होती. सिडको एन-८ रुग्णालयचे सर्व कर्मचारी यांच्या नियोजनबद्द कार्यामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यात आले .

# अविनाश पाठक यांना सात दिवसांची कोठडी!

बीड दि.८ (प्रतिनिधी)- सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणात २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी गुरुवारी अटक केली.पाठक यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना १५ मे पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करुन अपहार झाला होता. या प्रकरणी बीडच्या शिवाजी पोलीस ठाण्यात पूर्वी दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.आज बीड न्यायालयासमोर त्यांना उभे केले असता त्यांना १५ मे पर्यंत ७ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे समजते.

या प्रकरणातील कागदपत्रांमध्ये अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यास अटक होण्याची अलिकडच्या काळातील ही पहिलीच वेळ असल्याने खळबळ उडाली आहे.

# संत एकनाथ साखर कारखाना प्रकरण: सचिन घायाळ यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

पैठण दि.८ (प्रतिनिधी)- पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालकीच्या संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याशी संबंधित कथित कर्ज घोटाळा प्रकरणात कारखाना करार पद्धतीने चालविणारे सचिन घायाळ यांना मोठा धक्का बसला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शुक्रवारी (दि. ८) त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.वृत्तपत्र सदस्यता

संत एकनाथ सहकारी साखर कारखाना गेल्या काही वर्षांपासून 'सचिन घायाळ प्रायव्हेट शुगर लिमिटेड' या कंपनीकडे करार तत्वावर चालविण्यास देण्यात आला होता. मात्र, करारातील अटींचे उल्लंघन करत कारखान्याची मालमत्ता बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीकडे गहाण ठेवून सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज घेतल्याचा आरोप आहे. यापैकी १६ कोटी ६२ लाख रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा ठपका सचिन घायाळ यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

तसेच, कारखाना चालविताना कामगारांचे पीएफ, वेतन तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे देयके न दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मधुकर मोरे तपास करत आहेत.

दरम्यान, सचिन घायाळ यांनी यापूर्वी १ एप्रिल २०२६ रोजी पैठण जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत पुन्हा अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला.

उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने ॲड. अमरजीतसिंह गिरासे यांनी बाजू मांडली, तर तक्रारदार दीपक मोरे यांच्या वतीने ॲड. डी. आर. काळे आणि ॲड. डी. एस. दसपुते यांनी जामीन अर्जाला विरोध केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सचिन घायाळ यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

# बर्ड बीएनबी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- शहरी भागात पक्ष्यांसाठी सुरक्षित घरटी निर्माण करणे ही काळाची गरज असून, नागरिकांनी पक्षीसंवर्धनासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पक्षीतज्ज्ञ व ईआरएफईए चे अध्यक्ष डॉ. दिलीप यार्दी यांनी केले. ईआरएफईए आणि वँडर अँड पॉझ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बर्ड बीएनबी' कृत्रिम पक्षीघरटे निर्मिती कार्यशाळेत ते बोलत होते.

नुकत्याच पार पडलेल्या या कार्यशाळेला निसर्गप्रेमी नागरिक, लहान मुले, युवक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शास्त्रीनगर येथील सभागृहात आयोजित या उपक्रमासाठी निसर्ग आणि पक्ष्यांवरील आकर्षक सजावट करण्यात आली होती.

यावेळी बोलतांना डॉ. यार्दी आणि त्यांच्या टीमने पक्ष्यांच्या प्रजनन काळात निर्माण होणाऱ्या अडचणी, शहरीकरणामुळे कमी होत चाललेल्या नैसर्गिक घरट्यांच्या जागा आणि कृत्रिम घरट्यांचे महत्त्व याविषयी माहिती दिली. उन्हाळ्यात मार्च-एप्रिल पासून पक्ष्यांचा प्रजनन हंगाम सुरू होतो. मात्र, शहरांमध्ये झाडांची कमतरता आणि सुरक्षित जागांचा अभाव यामुळे अनेक पक्ष्यांना घरटी बांधण्यासाठी अडचणी येतात. अशा परिस्थितीत कृत्रिम घरटी त्यांना मोठा आधार ठरतात, असे त्यांनी सांगितले.

डॉ. दिलीप यार्दी म्हणाले, 'गेल्या तीन-चार वर्षांच्या निरीक्षणातून या घरट्यांची रचना विकसित करण्यात आली आहे. मोठे पक्षी किंवा कबुतरे आत जाऊ नयेत, यासाठी त्याची विशेष रचना करण्यात आली आहे. शहरी भागात पक्ष्यांसाठी नैसर्गिक जागा उरलेल्या नाहीत. त्यामुळे कृत्रिम घरटी आणि वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक बनले आहे.'

## नाशिकमधील टीसीएस धर्मांतर...

न्याय मंत्री व शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

संजय शिरसाट म्हणाले की, काल संभाजीनगरमधून नाशिक पोलिसांनी नाशिक धर्मांतरप्रकरणी निदा खान या मुख्य आरोपीला अटक केली. मार्चमध्ये ही घटना घडली होती. निदा खान दीड-दोन महिने कुठे होती हे माहीत नाही. निदा खान संभाजीनगरमध्ये अशा परिसरात लपली होती, जो झोपडपट्टी एरिया आहे. तिथे अमली पदार्थांचे धंदे चालतात. ही खान एकटी नव्हती तर तिची आई आणि मावशी तिच्या सोबत होती. तिला एमआयएमने सहकार्य केले. एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मागे सुद्धा त्या संदर्भात उघडपणे वक्तव्य केले होते आणि एका अर्थाने तिला पाठिंबा दर्शविला होता. इतरही ठिकाणी एमआयएम त्यांच्या हालचाली वाढवत आहेत. धर्मांतर करणे, मुलींना फसवणे हे सगळे प्रकार एमआयएमच्या नेतृत्वात होतात. निदा खान हा एक मोहरा आहे. त्यांचे महाराष्ट्रभर जाळे पसरले आहे. पुणे, संभाजीनगरसह सगळीकडे असे प्रकार पाहायला मिळतील. हिंदुंचा द्वेष करण्याचे प्रकार सुरू आहेत, असा आरोप त्यांनी केलाय.

संजय शिरसाट पुढे म्हणाले की, मी मुख्यमंत्र्यांना भेटून या प्रकरणी एसआयटी चौकशीची मागणी करणार आहे. मुख्य सूत्रधार कोण? याचा शोध लागला पाहिजे. २२ ते ३० वर्षांच्या दरम्यानच्या तरुणांना असे प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्याकडे नोकरी नाही तरी त्यांच्याकडे पैसा आहे. बाईक आहेत हा पैसा कुठून येतो? बलात्कार, नशेखोरीचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो. इम्तियाज जलील यांची देखील चौकशी झाली पाहिजे. हे एक मोठं षडयंत्र आहे. निदा खानला का उघड पाठिंबा दिला? तिच्यासाठी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. निदा खान इतर कुठेही न जाता केवळ संभाजीनगरलाच का जाते? याआधी देखील दहशतवादी हालचालींसाठी संभाजीनगर प्रसिद्ध आहे, असे देखील त्यांनी म्हटले.

## दहावीच्या परीक्षेत मराठी...

परीक्षा दिली असून १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उतीर्णतेची टक्केवारी ९२.०९ इतकी आहे.

दहावीची परीक्षा दिलेल्या एकूण ८ लाख २० हजार ४२७ मुलांपैकी ७ लाख ३४ हजार ८१४ मुले (८९.५६ टक्के) तर एकूण ७ लाख २२ हजार ०४५ मुलींपैकी ६ लाख ८५ हजार ६७२ मुली (९४.९६ टक्के) उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने अधिक आहे.

या परीक्षेत एकूण ३५ विषयांपैकी १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०० टक्के निकाल लागणाऱ्या शाळांचीही संख्या वाढत चालली आहे. मात्र प्रथम भाषा म्हणून मराठी विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या राज्यातील सुमारे १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ८० हजार ८०३ विद्यार्थी नापास झाले आहेत. म्हणजेच जवळपास ८ टक्के विद्यार्थी नापास झाले आहेत. तर द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या एकूण ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांपैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी नापास झाले आहेत. मराठी हीच मातृभाषा असलेले विद्यार्थी मराठी विषयातच नापास होत आहेत, याचा अर्थ या विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्य अवगत नसल्याचेच स्पष्ट होत असून मराठी विषयाच्या अध्यापन प्रक्रियेच्या पुनर्विचाराची गरज यानिमित्ताने अधोरेखित केली आहे.

## सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था...

शेतकऱ्यांना न्याय देण्याची जबाबदारी सरकारची आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, परीक्षांमधील गोंधळ आणि भ्रष्टाचार वाढत चालला आहे. माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे की महिला आणि नागरिकांची सुरक्षितता ही सरकारची नैतिक जबाबदारी असते त्यामध्ये आम्ही कधीही राजकारण आणले नाही. भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा हे पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने बोलत असतात. पण कुठे ना कुठे हे सुरू असल्याचे दिसून येते. भ्रष्टाचाऱ्यांना सरकारने मदत करू नये, मग त्यामध्ये कोणीही असो. राज्यातील जनतेने महायुतीला मोठा जनादेश भ्रष्टाचारी लोकांना वाचवण्यासाठी दिलेला नाही असे त्या म्हणाल्या.

## मनोज जरांगे सरकारविरोधात...

कारण सरकार आहे. त्यामुळे सारथीपासून अण्णासाहेब पाटील महामंडळापर्यंत, तसेच हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाल्यापासून कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यापर्यंत त्यांनी अंमल बजावणी केली. पण कुणबी प्रमाणपत्र वाटप होत नाही. आता जूनमध्ये मराठा समाजाच्या मुलांचे प्रवेश आहेत. त्यांना कुणबी प्रमाणपत्र हवे आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र हवे आहे. पण सरकार ते जाणिवपूर्वक देत नाही. सातारा संस्थानचे गॅझेटिअर का निघत नाही? गुन्हे अद्याप मागे का घेतले नाही? असे जरांगे म्हणाले आहेत.

## निराधार गतिमंद महिलेवर...

घेऊन शासकीय रुग्णालयात तपासणीसाठी नेले. तिथे झालेल्या वैद्यकीय तपासणीत ती महिला पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले, ज्यामुळे गावात एकच खळबळ उडाली.

या धक्कादायक प्रकारानंतर पीडितेच्या भावाने भिसी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत अज्ञात नराधमाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सध्या आरोपीचा कसून शोध घेत आहेत. अशा नराधमाला लवकरात लवकर अटक करून कठोर कायदेशीर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका
(बाजार व परवाना विभाग)
दुरध्वनी क्र ०२४०-२३३३५६६-४०, पोस्ट बॉक्स क्र.१२५,
टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर ४३१००१

जा क्र/मनपा/स.अ/बाजार व परवाना विभाग/२०२६/१३६
दि : ०८/०५/२०२६

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित गटाई कामगारांना याव्दारे जाहीर करण्यात येते की, महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले गटाई कामगारांचे पिच परवान्याची मुदत दिनांक ३१ मार्च रोजी समाप्त झालेली आहे. सदर परवान्यांचे नूतनीकरण करणे बंधनकारक आहे.

सर्व संबंधित गटाई कामगारांनी महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागाकडे आवश्यक कागदपत्रांसह तात्काळ उपस्थित राहून आपले पिच परवाने (गटाई कामगार) नियमानुसार नूतनीकरण करून घ्यावेत.

नियत मुदतीत परवाना नूतनीकरण न केल्यास संबंधितांविरुद्ध महानगरपालिका अधिनियम व प्रचलित नियमांनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तसेच अधिक माहितीसाठी बाजार व परवाना विभागाशी संपर्क साधावा.

-स्वाक्षरीत-
उप आयुक्त - १
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act